**रशियाचे पहिले उपपंतप्रधान, महामहिम डेनिस मंतुरोव यांची भारत भेट (02-03 एप्रिल 2026)**

03 एप्रिल 2026

रशियाचे पहिले उपपंतप्रधान, महामहिम डेनिस मंतुरोव यांनी 02-03 एप्रिल 2026 दरम्यान भारताला भेट दिली.

2. पहिले उपपंतप्रधान मंतुरोव, जे व्यापार, आर्थिक, वैज्ञानिक, तांत्रिक आणि सांस्कृतिक सहकार्यावरील भारत-रशिया आंतर-सरकारी आयोगाचे (IRIGC-TEC) सह-अध्यक्ष देखील आहेत, त्यांनी 02 एप्रिल 2026 रोजी नवी दिल्ली येथे परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांच्यासोबत द्विपक्षीय बैठक घेतली.

3. तंत्रज्ञान, नवोपक्रम आणि महत्त्वाच्या खनिजांमध्ये नवीन संधींव्यतिरिक्त व्यापार, उद्योग, ऊर्जा, खते, कनेक्टिव्हिटी आणि गमनशीलता यावर लक्ष केंद्रित करून उभय बाजूंनी विस्तृत चर्चा केली. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये आयोजित 23व्या भारत रशिया वार्षिक शिखर परिषदेच्या विविध परिणामांच्या अंमलबजावणीच्या प्रगतीचा दोन्ही बाजूंनी आढावा घेतला. सह-अध्यक्षांनी पश्चिम आशियातील संघर्षासह प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवर देखील विचारांची देवाणघेवाण केली.

4. पहिले उपपंतप्रधान मंतुरोव यांच्या इतर द्विपक्षीय सहभागांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सदिच्छा भेट, तसेच वित्त आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्री श्रीमती निर्मला सीतारमण आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार श्री. अजित डोवाल यांच्यासोबतच्या बैठकांचा समावेश होता.

नवी दिल्ली

03 एप्रिल 2026